पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र.७८ दिनांक १९/०९/२०२६

एटीएम कार्डची अदलाबदल करुन खात्यातील रक्कम लंपास करणाऱ्या आरोपीस पालघर पोलीसांकडून अटक

दिनांक ०४/०९/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०५ सुमारास फिर्यादी श्री. बाबुलाल नेमाराम परमार, वय ३८ वर्षे, रा. साईदिप अर्पा. बिल्डींग नं. ०३/१०२ त्रिवेदीनगर, सरावली बोईसर ता. जि. पालघर हे बँक ऑफ बडोदाचे ए. टी. एम. कार्ड घेऊन बोईसर सर्कस ग्राउंड जवळील पुरोहीत थाल हॉटेलच्या खाली असलेल्या बँक ऑफ बडोदा बँकेच्या ए. टी. एम. मध्ये पैसे काढण्याकरीता गेले असता फिर्यादी यांच्या पाठिमागे येऊन उभा असलेल्या अनोळखी आरोपीने हातचालाखीने फिर्यादीचे ए. टी. एम. कार्डची अदलाबदल करुन एकुण ५०,०००/- रुपये रक्कम काढुन घेऊन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. सदर बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बोईसर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं । ३६६/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४) प्रमाणे दिनांक ०५/०९/२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन श्री. यतिश देशमुख, पोलीस अधिक्षक, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली बोईसर पोलीस ठाणेचे तपास पथक तयार करण्यात आले. सदर पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपणीय माहितीच्या आधारे अनोळखी आरोपीत याचा शोध घेवुन त्यास निष्पन्न करुन आरोपीत नामे अफसर अब्दुल गफार खान, वय ३९ वर्षे, राहणार रुम नं. ०७, शास्त्रीनगर कलिना सांताक्रुझ मुंबई, मुळ राहणार राणीगंज, पोस्ट. दिलीपुर, ता. दिलीपुर, जि. प्रतापगड, राज्य उत्तरप्रदेश यास शास्त्रीनगर कलिना सांताक्रुझ, मुंबई येथून ताब्यात घेवुन त्यास दिनांक १६/०९/२०२६ रोजी ०४.२६ वा. अटक करण्यात आले आहे. त्याचेकडून गुन्हयात गेलेल्या एकुण रक्कमेपैकी ३८,०००/- रुपये व गुन्हयात वापरलेले वाहन जप्त करण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक/विनय मोरे, नेमणुक बोईसर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. दिनेश बैसाने, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुनिल जाधव, सहा. पोलीस निरीक्षक/सुनिल साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक/विनय मोरे, पो.हवा/विजय दुबळा, पो.हवा/निरज शुक्ला, पो.हवा/सुनिल मलावकर पो.ना./योगेश गावित, पो.शि/गणेश व्हसकोटी, पो.शि/मयुर पाटील, पो.शि/धिरज साळुंखे पो.शि/देवेंद्र पाटील, पो.शि./मच्छिंद्र घुगे, पो.शि/शुभम सपकाळे, पो.शि/सचिन सोनावणे, पो.शि/रोहित पाटील, पो.शि/किरण वाघ सर्व नेमणुक बोईसर पोलीस ठाणे तसेच सायबर पोलीस ठाणे, पालघरचे पो.शि/१४६८ अक्षय शेट्ये, पो.शि/५७ रुपेश पाटील यांनी केलेली आहे.